महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१२/४३२/४६३/४७८
ई-मेल-desk12@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**कार्यालयीन आदेश**

क्रमांक : १२/आस्था/बदल्या/लले(उ.श्रे)/२०२१/ ३२३
दिनांक : 9 AUG 2021

संदर्भ : १. महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग संकिर्ण-२०१५/(०१/१५)/मशि-१,दि.२५.०५.२०१५
३. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : एसव्हीआर-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ , दिनांक ०९.०४.२०१८.
४. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : एसव्हीआर-२०२१/प्र.क्र.२०/कार्यासन १२ , दिनांक ०९.०७.२०२१.
५. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : एसव्हीआर-२०२१/प्र.क्र.२०/कार्यासन १२ , दिनांक २९.०७.२०२१.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन व वरील संदर्भ क्रमांक २ ते ५ मधील सूचना व तरतूदी विचारात घेवून संचालनालय स्तरावर घेण्यात आलेल्या नागरी सेवा मंडळाच्या बैठकीच्या शिफारशीनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील **बृहन्मुंबई संवर्गातील लघुलेखक (उच्चश्रेणी)** पदावरील खालील कर्मचाऱ्यांच्या सदर अधिनियमातील कलम ३ (१) मधील तरतुदीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव, पदनाम व सध्याचे कार्यरत ठिकाण | बदली नंतरचे पदस्थापनेचे ठिकाण | बदलीचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती मानसी वि. वानखेडे,<br>लघुलेखक (उच्चश्रेणी)<br>शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई येथे श्रीमती अस्मिता नाईक यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या पदावर | प्रशासकीय |
| २ | श्रीमती अस्मिता रा. नाईक,<br>लघुलेखक (उच्चश्रेणी)<br>तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई येथे श्रीमती मानसी वानखेडे यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर | विनंती |

२. सदर बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता कार्यालय प्रमुखांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(१) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यावर कार्यालय प्रमुखांनी पर्यायी कर्मचारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ (म.नं.) पर्यंत कार्यमुक्त करावे.

(२) बदली झालेले कर्मचारी त्यांच्या पूर्वीच्या पदस्थापनेच्या ठिकाणाहून कार्यमुक्त होवून रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या कर्मचाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाला जबाबदार धरण्यात येईल.

(३) बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

(४) सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेने / कार्यालयाने काढावे. दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या संस्थेकडून / कार्यालयाकडून काढण्यात येवू नये. सदर वेतन संबंधित कर्मचारी बदलीच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर बदलीनंतरच्या संस्थेने / कार्यालयाने काढावे व तसा अहवाल या संचालनालयास सादर करावा. दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ पासूनचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील / कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल.

३. उपरोक्त आदेशातील विनंती बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यास बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही आणि उपरोक्तपैकी ज्या कर्मचा-याची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यांत आली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
३. प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, मुंबई
४. लेखा व कोषागार अधिकारी, लेखा व कोषागार कार्यालय, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

**त्यांना कळविण्यांत येते की, सदर आदेशान्वये बदल्या केलेल्या सर्व कर्मचा-यांचे दि.२५ ऑगस्ट २०२१ पर्यंतचे वेतन सध्या कार्यरत असलेल्या संस्थेमार्फत /कार्यालयामार्फत अदा करावयाचे आहे. दिनांक २६ ऑगस्ट २०२१ पासूनचे वेतन बदली झालेल्या संस्थेमार्फत / कार्यालयामार्फत अदा करावयाचे आहे.**

५. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.६ (लेखा विभाग), तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई – ४०० ००१
६. संबंधित कर्मचारी ( **संबंधित कार्यालय / संस्था प्रमुखांमार्फत** )
७. कार्यासन क्र.१२, मुख्य कार्यालय, मुंबई ( निवड नस्ती )